**Order below Exh. 88 in R.C.S.No. 73/13**

**.........**

1. Heard both the parties. Perused the record. It appears that no W.S. order was passed against defendants No. 1 & 4, and as they failed to file their W.S. within stipulated period. It has been specifically stated that as the defendants No. 1 & 4 are having old age, could not attend the dates of hearing of suit. Due to their physical inability, it was unable for them to submit their W.S. within stipulated period. This fact has been denied by plaintiff and resist and opposed the said application on the count that there is no such kind of evidence on record which supports the contention of defendants. Admittedly the defendants No. 1 & 4 are senior citizens and having old age. Basically the suit is for partition and separate possession. Defendants are the co-sharers in the suit property. Therefore, in order to solve the real dispute between the parties and for effective adjudication, the W.S. of defendants should be on record. At the same time delay causing to hearing due to act of defendants can not be ignored. Hence, in the interest of justice I proceed to pass the following order.

**O R D E R**

1. The application is allowed subject to cost of Rs. 200/- and be paid to the plaintiff.

2. After compliance of cost, the W.S. of defendants No. 1 & 4 shall be read and recorded.

(R.M.Choutre)
Nyayadhikari Gramnyayala
Vaibhavwadi

Date :- 08/03/2016

## रे.दि.मु.नं. ७३/१३ मध्ये नि. ८९ खालील आदेश

........

१ प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र. २ तर्फे दिवाणी प्रक्रीया संहिता क्रम ६ नियम १७ अन्वये कैफियतीमध्ये सुधारणा करणेकरता दाखल.

२. अर्जातील संक्षीप्त कथन असे की, वादीने प्रस्तुतचा दावा प्रतिवादींचे विरूध्द वाटप व तुटक कब्जा मिळणेकरता दाखल केला आहे. प्रतिवादी क्र. २ ने त्याची कैफियत (नि. ७७) अभिलेखावर दाखल केलेली आहे. परंतु कैफियतीमध्ये परिच्छेद क्र. २५ मध्ये “त्या मिळकती वादी व प्रतिवादी क्र. १० ते १३ यांच्या दावा कलम १ मध्ये वर्णन केल्याप्रमाणे समाईक आहेत” असे टंकलेखनाच्या दोषामुळे नमूद झालेले आहे. वस्तुत: त्याठिकाणी “त्या मिळकती प्रतिवादी क्र. १ ते ४ व प्रतिवादी क्र. १० ते १३ यांच्या दावा कलम १ मध्ये वर्णन केल्याप्रमाणे समाईकात आहेत” असे टंकलीखीत होणे आवश्यक व महत्वाचे होते. सदर दुरूस्ती कैफियतीमध्ये न झाल्यास प्रतिवादी क्र. २ चे अपरिमित असे नुकसान होणार आहे. मात्र, सदरची दुरूस्ती झाल्यास मुळ कैफियतीच्या स्वरूपात कोणताही बदल होणार नाही. त्यामुळे प्रस्तुतचा अर्ज कैफियमतीमध्ये सुधारण करणेकरता दाखल.

३. प्रस्तुतच्या अर्जाला वादीतर्फे नि. ९० येथे म्हणणे देताना त्यातील नमूद कारणास्तव प्रतिवादी क्र. २ चा अर्ज नामंजूर करण्याची मागणी करण्यात आली. प्रतिवादी मागणी करत असलेल्या दुरूस्तीमुळे दाव्याचे व कैफियतीचे पूर्ण स्वरूप बदलणारे आहे असे कथन करण्यात आले. प्रतिवादीच्या कबूलीस टंकलेखानातील चुक असे म्हणता येणार नाही. ती कबूली म्हणून अभिलेखावर पुढे आलेली आहे. सदरची कबूली त्याच्यावर बंधनकारक आहे. त्यामुळे दुरूस्तीच्या नावाखाली प्रतिवादीला ती रद्द करून मागता येणार नाही. यास्तव प्रस्तुतचा अर्ज नामंजूर करण्याची मागणी करण्यात आली.

४. वरील दोन्ही बाजूचे कथन लक्षात घेता अर्जाच्या निकाल निश्‍चितीकरीता खालील मुद्दे माझे विचारार्थ उपस्थित झाले. त्यांचेवरील निष्कर्ष त्या त्या कारणमिमांसेवर विसंबून दिलेले आहेत.

| | **मुद्दे** | | **निष्कर्ष** |
|---|---|---|---|
| १. | प्रस्तावित सुधारणेचा अर्ज मंजूर करणे न्यायोचित ठरते का ? | ... | होय. |
| २. | आदेश कोणते ? | ... | अंतिम आदेशाप्रमाणे |

### का र ण मि मां सा

**मुद्दा क्र. १ व २ बाबत** :—

५. दिवाणी प्रक्रीया संहिता क्र. ६ नियम १७ अन्वये जर प्रस्तावित सुधारणेमुळे अ)

विरूध्द बाजूस अन्याय होणार नसेल व ब) दाव्यातील खरे प्रश्न निकालात काढण्याकरता आवश्यक असेल तर त्या दुरूस्तीस परवानगी दिली पाहिजे. मूळ मागणीशी संबंधीत नसलेली मागणी करणारी दुरूस्ती वादकथन पत्रात अगर कैफियतीमध्ये करता येणार नाही. याठिकाणी ही गोष्ट लक्षात घेणे आवश्यक ठरते की दाव्याचे सुनावणीस अद्याप प्रारंभ झालेला नाही. अभिलेखावर अद्याप साक्षीपुरावा नोंदविण्यात आलेला नाही. त्यामुळे वादी व प्रतिवादींना त्यांचे म्हणणे मांडण्याची व एकमेकांचे कथनांचे खंडण करण्याची पुरेशी संधी उपलब्ध आहे. सदरचे प्रस्तावित सुधारणेचे अवलोकन करता ती केवळ टंकलेखन दोषामुळे करण्यात येत आहे याविषयी खात्री पटते. कारण मूळातच प्रस्तुतचा दावा वाटपासाठी असून वादीने दावा मिळकतीमध्ये त्याच्या अनुक्रमे ७/१२० हिश्याचे व ७/२४० हिश्याचे सरस निरस मानाने वाटप मागितलेले आहे. प्रतिवादींच्या कथनानुसार दावा मिळकत “अ” ते “फ” या मयत मूळ पुरूष रेवप्पा याच्या स्वकष्टार्जीत मिळकती असल्याचे कथन करण्यात आलेले आहे. थोडक्यात, मूळ पुरूष रेवाप्पा याचा दावा मिळकतीशी कोणताही संबध नसल्याचे प्रतिवादींचे कथन आहे. त्यामुळे प्रस्तावित सुधारणा ही कबूली असल्याचे म्हणता येणार नाही. एकंदरीतच, कैफियतीचे स्वरूप लक्षात घेता दावा मिळकतीशी वादी व प्रतिवादी क्र. ५ ते ९ यांचा कोणताही व कसलाही संबंध नसल्याचे प्रतिवादीचे कथन असल्याचे पहाता येते. त्यामुळे प्रस्तावित सुधारणेतील मजकुर ही प्रतिवादी क्र. १ याची स्पष्ट कबूली आहे असे निष्पन्न होत नाही. वादाकरता चुकीने कबूली देण्यात आली आहे असे गृहित धरले तरी देखील कैफियतीमध्ये जर काही गोष्टी चुकीने कबूल केल्या असतील तर ती कैफियत दुरूस्त करता येते. अशा परिस्थितीत वादीचा आक्षेप स्विकारार्ह रहात नाही.

६. प्रस्तावित सुधारणेच्या मजकुरामुळे दाव्याचे अगर कैफियतीच्या मूळ स्वरूपात कोणताही बदल होत नाही. अद्याप दाव्याचे सुनावणीस प्रारंभ झाला नसल्यामुळे प्रस्तावित सुधारणेच्या मजकुराचे खंडण करण्याची संधी वादीला उपलब्ध आहे. त्यामुळे प्रस्तावित सुधारणा मंजूर झाल्यास वादीचे नुकसान होवू शकते अशी परिस्थिती या ठिकाणी नाही. दावा वाटपाचा असल्यामुळे दाव्यातील खरे प्रश्न निकालात काढण्याकरता प्रस्तावित सुधारणेतील मजकुर आवश्यक असाच ठरतो. पर्यायाने, प्रस्तावित सुधारणेचा अर्ज मंजूर करण्यास पात्र रहातो. परंतु त्याचवेळी झालेल्या विलंबाकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. सबब, न्यायाचे कारणास्तव मी खालील आदेश पारीत करत आहे.

## आ दे श

१. प्रस्तुतचा अर्ज मंजूर करणेत येतो.

२. प्रतिवादी क्र. २ ने मूळ कैफियतीमध्ये प्रस्तावीत सुधारणेचा मजकुर आज रोजी अगर दाव्याचे सुनावणीचे पुढील तारेखेपर्यंत समाविष्ट करून तशी सुधारीत कैफियतीची प्रत

दाव्याचे अभिलेखावर सादर करावी.

३. सदरची पूर्तता करणेस प्रतिवादी क्र. २ अपयशी ठरल्यास दिवाणी प्रक्रिया संहिता क्रम ६ नियम १८ प्रमाणे पुढील आदेश पारीत केले जातील.

४. प्रतिवादी क्र. २ ने वादीला खर्चाची रक्कम म्हणून रूपये २००/— ( दोनशे मात्र) अदा करावेत.

( रा.म.चौत्रे )
न्यायाधिकारी, ग्रामन्यायालय

दिनांक :— ०८/०३/२०१७

वैभववाडी